MHKO100001822010

**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. ४५/२०१०</u>**

नागव्वा जांगनूरे वगैरे.
//वि//
लकाप्पा जांगनूरे - मयत वारस वगैरे.

## <u>निशाणी क्र. ५९ वर आदेश</u>

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशीका ६, नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादींतर्फे सदर अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. वादी यांनी अर्जात असे कथन केले आहे की, त्यांनी प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी व हक्कज्ञापनासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ हे मयत झालेनंतर त्यांचे वारस अभिलेखावर आणलेले आहेत. तथापि, प्रतिवादी क्र.१ब ही सदर मयत प्रतिवादीची मुलगी असून तिचे लग्नानंतरचे नांव व पत्ता वादींच्या मागणीप्रमाणे निशाणी क्र.५३ ला प्रतिवादी यांनी दिलेला आहे. त्यामुळे, त्याअनुषंगाने वादी यांना सदर प्रतिवादी क्र.१ब यांच्या नांवात व पत्त्यात दुरुस्ती करणे आवश्यक झाले आहे. सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असुन सदर दुरुस्तीमुळे दावेचे मुळ स्वरुपात बदल होणार नाही. सबब, वादी यांनी अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जाचे मागील पानावर हरकत नोंदविली व असे कथन केले की, प्रस्तुत दुरुस्तीबद्दल वादी यांना पूर्वीच माहिती होती. तसेच, निशाणी क्र.५३ वरील अर्जावर प्रतिवादी यांनी प्रतिवादी क्र.१ब हिचा पत्ता दिलेला होता, तरीदेखील वादींनी दुरुस्ती मुदतीत केली नाही. त्यामुळे, वादीवर योग्य तो खर्च लावून योग्य तो आदेश करणेची विनंती केली.

०४. प्रकरणाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादी यांनी कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ हे मयत झालेनंतर त्यांचे वारस अभिलेखावर आणलेले आहेत. तथापि, प्रतिवादी क्र.१ब ही सदर मयत प्रतिवादीची मुलगी असून तिचे लग्नानंतरचे नांव व पत्ता वादींच्या मागणीप्रमाणे निशाणी क्र.५३ ला प्रतिवादी यांनी दिलेला आहे. त्यामुळे, त्याअनुषंगाने

वादी यांना सदर प्रतिवादी क्र.१ब यांच्या नांवात व पत्त्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तरी दाव्याचे स्वरुप पाहता वादींनी मागणी केलेप्रमाणे दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची आहे. त्यामुळे, सदर दुरुस्ती केलेस प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याऊलट, प्रतिवादी क्र.१ब यांचे खरे नांव व पत्ता अभिलेखावर आल्यास दावा हा गुणदोषावर निकाली होण्यास मदतच होणार आहे. त्यामुळे, मुळ दाव्यात कोणतीही दुरुस्ती नसल्याने व केवळ नांवामध्ये दुरुस्ती असल्यामुळे मुळ दाव्यात कोणतेही बदल होत नसल्याने दाव्याचे स्वरुप बदलणारे नाही. सबब, प्रस्तावित दुरुस्ती मंजुर केल्यास दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. शिवाय, प्रतिवादी क्र.१ब चा पत्ता हा निशाणी क्र.५३ वरील अर्जानुसार दिल्यानंतर प्रस्तुत अर्ज वादीने तात्काळ दिलेला असल्याने वादीस अर्जाचा खर्च देणे योग्य होणार नाही. सबब, अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. त्यामुळे, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**-: <u>आदेश</u> :-**

०१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. वादी यांनी अर्जात सुचविलेली दुरुस्ती १४ दिवसांच्या आत दाव्यामध्ये करुन त्याअनुषंगाने दुरुस्त दाव्याच्या प्रती न्यायालयात सादर कराव्यात.

Digitally signed by SUJIT AMBADAS RATHOD
Date: 2023.07.19 17:29:55 +0530

**( एस. ए. राठोड )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः १९/०७/२०२३.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. A. Rathod,<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 19/07/2023 |
| Order signed by P.O. on | 19/07/2023 |
| Order uploaded on | 19/07/2023 |